# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण या कंपन्यांमध्ये असलेली रिक्त पदे**

**(१) ६ (१८-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण मध्ये एकूण ७९ हजार ६३१ पदे मागील अनेक वर्षापासून रिक्त असुन ही पदे भरण्यास संबंधित प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरली नसल्यामुळे तसेच सध्या कर्मचारी पुनर्रचनेचे काम हाती घेण्यात आल्याने काही पदे कमी होणार असून जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त भार पडत आहे व कंत्राटी कामगारांची भरती जरी होत असली तरी त्यांना कामांचा आवश्यक अनुभव नसल्याने त्याचा विपरीत परिणाम कार्यरत असलेल्या मनुष्यबळावर आणि राज्यातील विद्युत ग्राहकांच्या सेवेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज कर्मचारी पदोन्नतीच्या तसेच सुशिक्षित-तांत्रिक बेरोजगार भरतीच्या प्रतिक्षेत आहेत हे ही खरे आहे काय

(४) असल्यास बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने सदर भरती त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-११-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) महावितरण कंपनीमध्ये वर्ग -१ ते वर्ग- ४ मधील एकूण ८१, ७०३ पदे मंजूर असून, २६,८५० पदे रिक्त आहेत. शासनाने दि. २३.०६.२०२० च्या पत्रान्वये महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांमधील विविध रिक्त पदांच्या भरती प्रकियेबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

---

**राज्य शासनाने उद्योग सेवाशुल्कात पाचपट वाढ केल्याबाबत**

**(२) ५६६ (०२-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उद्योग क्षेत्रातील हजारो कारखाने विविध कारणांमुळे बंद पडत असल्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उद्योग सेवाशुल्कात दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास पाचपट वाढ केली केली असल्याने अमरावतीसह राज्यात अनेक लहान मोठे उद्योग बंद पडून त्यात काम करणारे कामगार बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उद्योग सेवा शुल्कात दर वाढ करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत व राज्यात बंद स्थितीत असलेले कारखाने पुर्ववत सुरु करुन कामगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२०-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासनाने दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ वा त्यासुमारास उद्योग सेवाशुल्कात कोणत्याही प्रकारची पाचपट वाढ केलेली नाही.

(३) व (४) लागू नाही.

---

**अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील कृषी पंपाच्या विदयुत जोडण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ७७२ (१४-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर तालुक्यात (जि.लातूर) येथे महावितरणाच्या उपविभागात चार सर्कल असून त्यात अहमदपूर शहर एक ग्रामीण दोन आणि किनगाव एक असे सर्कल असून सन २०१६ ते २०१८ या दोन वर्षापासून उच्चदाब वितरण प्रणालीसाठी एक शेतकरी एक रोहित्र योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार शेतकऱ्यांच्या थेट बांधावर रोहित्र योजना देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापासून अहमदपूर तालुक्यातील कृषी पंपाच्या ३६९ शेतकऱ्यांच्या विदयुत जोडण्या प्रलंबित आहेत परिणामी तेथील शेतकऱ्यांची संख्या वाढतच आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयानुसार विविध योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांना उच्चदाब वितरण प्रणालीच्या माध्यमातून रोहित्र उपलब्ध करुन देणार असल्याचे महावितरणाचे उपविभागीय अभियंता श्री.पी.व्ही.काळे यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तसेच किती शेतकऱ्यांना उच्चदाब वितरण प्रणालीच्या माध्यमातुन विद्युत जोडण्या दिल्या आहेत व त्यासाठी किती निधी खर्च करण्यात आला आहे ?

**डॉ. नितिन राऊत (११-११-२०२०) :** (१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ०५ मे, २०१८ अन्वये उच्चदाब वितरण प्रणाली योजनेस मंजूरी देण्यात आलेली असून सदर योजनेमध्ये दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत नवीन कृषीपंप वीज जोडणीकरीता पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ग्राहकांना वीज जोडणी देण्याचा समावेश आहे. या योजनेत एका रोहित्रावर फक्त एक किंवा दोन ग्राहकांना कृषीपंप जोडणी देण्यात येत आहे. राज्यात दिनांक २०.०८.२०२० पर्यंत एकूण ७२,२५३ कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज पुरवठा करण्यात आला आहे.

(२) अहमदपूर तालुक्यात दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत ५३८ शेतकऱ्यांनी कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरलेले आहेत.सदर योजनेअंतर्गत दिनांक २०.०८.२०२० पर्यंत २७२ कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आलेली असून उर्वरित ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) योजनेबाबतच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) अहमदपूर तालुक्यात दिनांक २०.०८.२०२० पर्यंत २७२ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत व त्याकरिता अंदाजे रुपये ४.१९ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे.

---

**आदिवासी आश्रमशाळांमध्ये आरोग्य समूह योजनेत होत असलेली अनियमितता**

**(४) ९६९ (०९-०४-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळा व एकलव्य निवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांचे आरोग्य, पोषण व शिक्षण योग्य प्रकारे व्हावे यासाठी आदिवासी विभागामार्फत विशेष योजना राबविल्या जातात हे खरे आहे काय,
(२) असल्यास अति दुर्गम भागात असलेल्या आश्रम शाळेतील व एकलव्य निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना २४ तास आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याकरिता भारत विकास ग्रुप ऑफ इंडियाची २५ जुलै २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये नियुक्ती करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास आदिवासी विभागामार्फत विशेष केंद्रीय सहाय्य व आदिवासी जमाती विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत शासकिय आश्रम शाळातील विद्यार्थ्यांसाठी वार्षिक वैद्यकीय तपासणी व गरजू आजारी विद्यार्थ्यांसाठी तज्ञ डॉक्टरांच्या टेली मेडिसिन वैद्यकीय सेवा पुरविण्याकरिता कंपनीला प्रती विद्यार्थी ४०० रुपये प्रमाणे निधी उपलब्ध करून हैद्राबाद येथील 'मे अमया लाईफ' या कंपनीची निवड करण्यात आली हे खरे आहे काय,
(४) असल्यास कोट्यावधी रुपये खर्च करूनही आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शासकीय आश्रमशाळा व एकलव्य निवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना तपासणी व आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास अनेक आश्रमशाळेतील मुलींना आरोग्य सुविधा उपलब्ध झाली नसल्याने पालकांना व शाळेतील मुख्याध्यापकांना स्वखर्चाने आजारी मुलींना दवाखान्यात घेऊन जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास कोट्यवधी रुपये खर्च करून सदर समूह आरोग्य योजनेच्या अंमल बजावणी योग्य प्रकारे करत नसल्याबाबत आयुक्त आदिवासी विभाग यांच्याकडे वांरवार तक्रार करुनही कार्यवाही केली जात नाही हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्रम शाळेतील मुलांना आरोग्य सेवा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१९-११-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) हे, खरे नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत अटल आरोग्य वाहिनी योजनेंतर्गत १४ प्रकल्प कार्यालयातील ३०१ शासकीय आश्रमशाळा व ८ एकलव्य निवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

१) आजपर्यंत १,७०,८२० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी झालेली असून ५२,८८२ विद्यार्थ्यांनी सिकरूमचा वापर केलेला आहे.

२) १९,०३३ विद्यार्थ्यांना रूग्णवाहिकेद्वारे आपात्कालीन परिस्थितीत रुग्णालयात हलविण्यात आलेले होते.

३) ७,७३७ विद्यार्थ्यांना रुग्णालयात भरती करण्यात आलेली होते.

४) ७२ विद्यार्थ्यांना जीवास धोका असणारे आजार असल्याचे निष्पन्न झाले त्यामधील ७० विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

मे.अमेया लाईफ मार्फ़त १५ प्रकल्प कार्यालयातील २०१ शासकीय आश्रमशाळा व ६ एकलव्य निवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

१) १,३०,६८२ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी झालेली आहे.

२) ३७,२६८ आपात्कालीन कॉल आलेले आहेत.

३) ३९१ आरोग्य विषयक कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहे.

४) १० तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाचे सत्र घेण्यात आले आहे.

५) ६०६ विद्यार्थी रुग्णालयात भरती करून उपचार करण्यात आले आहेत.

६) ३८ विद्यार्थ्यांवर वेगवेगळ्या आजारांसाठी शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

७) वैद्यकीय तपासणीमध्ये आढळून आलेल्या १६ विद्यार्थ्यांवर हृदयविकाराची व ८ विद्यार्थ्यांवर cleft lip and palate आजाराची शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे.

(५) हे खरे नाही.

उपरोक्त नियमित बाबीव्यतिरिक्त विभागाच्या दिनांक ०४ मे, २०१८ च्या शासननिर्णयान्वये शाळा व्यवस्थापन समितीस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रु. ५.०० लक्ष निधीपैकी रु १.०० लक्ष निधी हा मुख्याध्यापकामार्फत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवरील तातडीने उपचारासाठी वाहतुक व उपचार करणे तसेच खाजगी वैद्यकिय तज्ञामार्फत विद्यार्थ्यांची सखोल वैद्यकिय तपासणी व उपचार करणेकरीता विनियोग करण्यात येतो.

(६) हे खरे नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी कार्यालयातील क्षेत्र व्यवस्थापक यांनी केलेला गैरव्यवहार

**(५) ९९३ (०३-०४-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी कार्यालय, ठाणे येथे कार्यरत असलेले क्षेत्र व्यवस्थापक, श्री.धर्मराज नवाळे यांनी त्यांच्या कार्यकाळात शासनाच्या नियमांची पायमल्ली करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधित प्रकरणी वारंवार विभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी करुनही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

तक्रारीबाबत प्राथमिक चौकशी करण्याकरीता प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म., ठाणे-१ यांना दि.२४.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.म., ठाणे-१ यांनी त्यांच्या दि.१७.०२.२०२० रोजीच्या अहवालात तक्रारीत तथ्यता वाटत नाही, सदर प्रकरण निकाली काढण्यात यावे असे नमुद केले आहे.

तसेच तक्रारदार मा.विधानसभा सदस्य श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), यांनी त्यांच्या दि.१४.०२.२०२० च्या पत्रान्वये श्री.धर्मराज नवाळे क्षेत्र व्यवस्थापक यांच्या बाबत केलेली तक्रार मागे घेत असल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे गत ४ वर्षापासून वेतन थकीत असल्याबाबत**

**(६) ११८७ (०३-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे गत ४ वर्षापासून वेतन थकीत असुन ७ वर्षापासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान (Gratuity) मिळाली नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक २२ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँकेने शासनाच्या आदेशानुसार थकीत शेतकऱ्यांना वनटाईम सेटलमेंट योजना राबवून बँकेला झालेल्या ७००० कोटी रुपये व्याजाचा तोटा बँकेला घेणे असलेल्या रकमेमधून कर्मचारी देणी सहज भागवू शकत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-१२-२०२०) :** (१) होय.
(२) नाही.

शासन निर्णय दि. २८.०९.२००७ नुसार सन २००७-०८ ते सन २०१३-१४ व सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या कालावधीकरीता एक रकमी कर्ज परतफेड योजना राबविली असून सदर योजनेंतर्गत रक्कम रु. ६९५.७२ कोटीचे व्याजाच्या नुकसानीचे क्लेम शिखर भुविकास बँकेचे अवसायक यांनी सहकार आयुक्तांना सादर केले होते. सहकार आयुक्तांनी सदर प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तथापि, शासनाला भुविकास बँकेकडून रु.१८९७.२४ कोटी येणे असून वरीलप्रमाणे तोट्याची रक्कम शासनाला देय असलेल्या रकमेमध्ये समायोजीत होईल.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम १०५ अन्वये संस्थेची थकीत देणी अदा करण्याची वैधानिक जबाबदारी अवसायकाची असते. त्यानुसार जिल्हा भूविकास बँकांतील कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करण्याची वैधानिक जबाबदारी संबंधीत अवसायकाची आहे. यासाठी अवसायकांनी थकीत कर्जाची वसुली करणे व भूविकास बँकेच्या मालमत्तेचा लिलाव करुन मिळणाऱ्या रकमेमधून कर्मचाऱ्यांची देणी देणेबाबत शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१५ नुसार सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निराधार, वृध्द, अपंग, विधवा यांना देण्यात येणारे अर्थसहाय्य आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून वितरित करण्याबाबत

**(७) १३२६ (२७-०७-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा, राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, विधवा निराधार योजना, अपंग अशा विविध योजनेद्वारे लाभ धारकांना मासिक अर्थसहाय्य बँकेद्वारे देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बहुतांश गावांमध्ये बँकेच्या शाखा नसल्याने तेथील बहुसंख्य लाभार्थ्यांना गावापासुन सुमारे १० ते १५ कि.मी. अंतरापर्यंत प्रवास करावा लागत असून, त्यामुळे वृद्ध, अपंग, विधवा व इतर लाभार्थ्यांना आर्थिक व मानसिक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी लाभार्थ्यांना मिळणारे अर्थसहाय्य प्रायोगिक तत्वावर उस्मानाबाद येथील शासनाच्या सेवा केंद्रांच्या मार्फत देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन उक्त लाभार्थ्यांना मासिक अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०७-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) उस्मानाबाद जिल्हयातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत लाभार्थ्यांना इंडियन पोस्ट पेमेंट बँकेकडून डी.बी.टी. प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अर्थसहाय्याचे वितरण करण्याचे नियोजन करुन काही गावांमध्ये प्रायोगिक तत्वावर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्हातील वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(८) १५९५ (०३-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा केंद्रीय बँक व इतर राष्ट्रीय कृत बँकेकडे हजारो शेतकऱ्यांचे सन २००८ पासूनचे कर्ज दिनांक ३० जून २०१६ पर्यंत थकीत होते, परंतू तद्नंतर बँकेने जबरदस्तीने तसेच शेतकऱ्यांना चुकीची माहिती देऊन व दिशाभूल करून थकीत कर्जाचे नूतनीकरण (पुनर्गठन) केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास. नूतनीकरण केल्याने सदर थकीत कर्जदार दिनांक ३१ जून २०१६ पर्यंत थकीत कर्जदार असतानाही माहे सप्टेंबर, २०१६ पर्यंत चुकीच्या पध्दतीने नूतनीकरण केल्याने दिनांक ३१ जून, २०१७ पर्यंत तांत्रिकदृष्टया हजारो शेतकरी कर्जमाफी पासुन वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलडाणा जिल्हा केंद्रीय बँकेने परवाना वाचविण्यासाठी थकीत शेतकऱ्यांचे कर्ज नवे-जुने करून शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवले असून याबाबत शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे जिल्हा केंद्रीय बँकेने कर्ज माफीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बुलडाणा केंद्रीय बँकेत १६ हजार कर्जदार असून ८३ कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली नसून राष्ट्रीयकृत बँकेकडे देखील मोठ्याप्रमाणात कर्जमाफीची रक्कम प्रलंबित असल्याने शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहिलेले असून त्यांनाही कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-१२-२०२०) :** (१), (२) व (३) नाही.

(४) अंशतः खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली हिवाळी अधिवेशन, नागपूर येथे दिनांक २०.१२.२०१९ रोजी झालेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या आढावा सभेमध्ये श्रीमती श्वेता महाले, विधानसभा सदस्य यांनी याविषयी प्रश्न उपस्थित केला होता.

(५) शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढून चिंतामुक्त करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक २७.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये “महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९” जाहीर केली आहे.

सद्यस्थितीत बुलडाणा जिल्ह्यातील १.६३ लाख कर्जखात्यांना रु. १०८०.६५ कोटीचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेवानिवृत्त वनाधिका-यांच्या घरी वनमजूर तैनात असल्याने शासकीय तिजोरीतून लाखो रूपयांचा खर्च होत असल्याबाबत**

**(९) १६१४ (१६-१०-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील वनक्षेत्रात गस्त घालणे, रोपवाटिकांची कामे करण्याऐवजी वनमजूरांना सेवानिवृत्त वनाधिका-यांच्या घरातील कामे करण्यास सांगण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनमजूरांनी घरगुती कामांकरिता नकार दिल्यास त्यांची विविध मार्गाने पिळवणूक केली जाते, पगार अडविले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सेवानिवृत्त वनाधिका-यांना शासकीय गाडयादेखील पुरविल्या जात असून यासाठी लागणारे पेट्रोल/डिझेलदेखील शासकीय हिशेबात घेण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२६-११-२०२०) :** (१), (२) व (३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या दिनांक ११.११.२०२० रोजीच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**राज्यात थेट पणन परवाना असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांबाबत**

**(१०) १८०५ (०१-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात थेट पणन परवाना असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यामार्फत शेतकऱ्यांच्या शेतीमालाची खरेदी केली जात असल्यामुळे गावानजिकची विक्री सुविधा उपलब्ध झाली असल्यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्या सक्षम करण्यासाठी त्यांना खाजगी कृषि उत्पन्न बाजार समितीप्रमाणे दर्जा देण्याकरिता पणन कायदयात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-११-२०२०) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अनुदानीत शाळेतील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(११) १८२२ (०२-०४-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग प्रवर्गाच्या अनुदानित शाळा कर्मशाळेतील सफाईकामगार, पहारेकरी, मदतनीस या मानधनावरील पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव योग्य त्या अभिप्रायासह मा.आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अनुदानीत शाळेतील पदांच्या मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२५-११-२०२०) :** (१) व (२) नाही.
परंतू दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडून दि.१९.०७.२०१८ अन्वये राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग प्रवर्गाच्या अनुदानित शाळा कर्मशाळेतील सफाईकामगार, पहारेकरी, मदतनिस या मानधनावरील पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदरहू प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाची मानीव हस्तांतरणाची प्रकरणे दाखल करण्यासाठी सुरु असलेली ऑनलाइन पद्धत ऑफलाईन करण्याबाबत

**(१२) २६२२ (०३-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाची मानीव हस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) ची प्रकरणे दाखल करण्यासाठी, सुरु असलेली ऑनलाइन पद्धत अनियमितपणे काम करीत असल्याने, सदर प्रकरणे ऑफलाइन दाखल करुन घ्यावीत असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सहकार आयुक्तांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई, ठाणे, पुण्यासह संपूर्ण राज्यात मानीव हस्तांतरण योजनेअंतर्गत एकूण किती प्रकरणे ऑनलाइन राज्य शासनास सादर झाली आहेत, त्यापैकी किती प्रकरणातील किती संस्थांना शासनाने ऑनलाइन मान्यता दिली आहे, तसेच किती प्रकरणे सद्या ऑनलाइन प्रक्रियेत अपूर्ण अवस्थेत प्रलंबित आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाइन प्रक्रियेतील अपूर्ण प्रकल्प मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दाखल करुन घेऊन निकाली काढण्याबाबत तसेच सदर मानीव हस्तांतरण प्रक्रिया सुरळीत विनाविलंब त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :**(१) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२५.१.२०१९ रोजी मानीव अभिहस्तांतरण अर्ज ऑफलाईन तसेच ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास परवानगी दयावी, असे आदेश दिले आहेत.

(२), (३) व (४) राज्यामध्ये दि.३० सप्टेंबर, २०२० अखेर मानीव अभिहस्तांतरणाचे जिल्हा उपनिबंधक तथा सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यालयाकडे एकूण ६,०६१ इतके ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैंकी ५,९१९ इतके अर्ज निकाली काढले आहेत. उर्वरित १७२ प्रकरणावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच, ६००२ इतके मानीव अभिहस्तांतरणाचे ऑफलाईन अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैंकी ५,३८२ इतके अर्ज निकाली काढले आहेत. उर्वरित ६२० अर्जांवर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील पेण अर्बन को ऑप.बॅकेत झालेला गैरव्यवहार

**(१३) २६९८ (०३-०४-२०२०). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पेण अर्बन को ऑप.बॅकेत सुमारे १० वर्षांपुर्वी ७५८ कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहारातील जबाबदार संचालक मंडळ, बँकेचे अधिकारी व कोट्यवधी रकमेचे कर्जदार यांचेकडून गैरव्यवहारातील ५९८.७२ कोटी अपहारित रक्कम वसूल करण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जिल्हाधिकारी, रायगड, जिल्हा पोलिस अधिक्षक, रायगड, रिझर्व बँकेचे उच्च अधिकारी, सहकार विभागातील अधिकारी व प्रशासक मंडळ यांची संयुक्त विशेष कृती समिती गठित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेच्या ठेवीदारांपैकी ४०० च्या वर ठेवीदारांचे निधनही झालेले असून, या समितीकडून अत्यंत अल्प अपहारित रक्कम वसूल केली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या समितीकडून प्रत्यक्ष वसूलीस होत असलेला विलंब व वसूली न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीने जप्त केलेल्या जमिनी व मालमत्ताची विक्री करून बँकेच्या १ लाख ९६ हजार ठेवीदारांचे पैसे त्वरीत परत मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-१२-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) सन २००८-०९ च्या पुनर्लेखापरिक्षण व सन २००९-१० च्या लेखापरिक्षण अहवालानुसार रु. ५९८.७२ कोटी रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले. सदर रक्कम वसूल करण्यासाठी शासनाच्या दिनांक १६.१२.२०१५ च्या आदेशान्वये मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष कृती समिती गठित करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) विशेष कृती समितीच्या सुचनेनुसार बँकेच्या निधीतून खरेदी केलेल्या ४७ मालमत्ता व बँकेच्या तत्कालीन संचालकांच्या ९६ मालमत्ता अशा एकूण १४३ मालमत्ता अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक ३१.०१.२०२० पर्यंत २१,६९३ ठेवीदारांना रु. १६.९५ कोटी ठेवींचे वाटप करण्यात आले आहे.

बँकेच्या एकूण ७९७० थकीत कर्जदारांपैकी ५३४९ कर्जदारांकडून दिनांक २९.०२.२०२० पर्यंत रु. १७८.०४ कोटी वसुली करण्यात आली असून उर्वरित कर्जदारांपैकी २६२२ कर्जदारांवर कलम १०१ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

बँकेच्या प्रशासक मंडळाने प्रभावी कर्जवसुली होणेकरीता एक रकमी कर्ज परतफेड योजना कर्जदारांना लागू केली आहे.

पोलीस निरीक्षक, पेण पोलीस स्टेशन यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाने १२८ बोगस कर्जप्रकरणात रु.५.१२ कोटी व १३१.६ एकर जमीन जप्त केली आहे. तसेच, तत्कालीन संचालकांची एकूण ६० एकर जमीन, ५ व्यापारी गाळे, ४ घरे अशी मालमत्ता जप्तीची कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत सी.बी.आय., प्रवर्तन निर्देशालय, तसेच, पोलीस अशा सर्व तपास यंत्रणांनी सुमारे रु. २८.१२ कोटी रोख रक्कम हस्तगत केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१४) ३६४८ (२८-०७-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात झालेल्या अवकाळी पावसामुळे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लाखो हेक्टर शेतपिकांचे नुकसान झाले हे खरे आहे काय,,
(२) असल्यास, कंळब तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत पंचनामे करुन किती शेतकऱ्यांना पात्र ठरविण्यात आले आहे,
(३) असल्यास, उक्त नुकसान भरपाई शासनामार्फत तहसिलदार कळंब यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येऊनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप ही वर्ग करण्यात आली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्य अनुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-११-२०२०) :** (१) खरे आहे.
(२) कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत पंचनामे करून ६४९०३ शेतकऱ्यांना पात्र ठरविण्यात आले आहे.
(३) तहसिलदार कळंब यांच्या खात्यावर रू.४७,२३,३३,४६५/- एवढया रक्कमेपैकी त्यांनी एकूण रू.४७,२२,४२,६७९/- एवढा निधी ६४९०३ इतक्या शेतकऱ्यांना वितरीत केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिगाव रेचा अंजनगाव वनपरिक्षेत्रातील (जि.अमरावती) २० वर्षापासून कार्यरत वन मजूरांना पुन्हा कामावर घेण्याबाबत**

**(१५) ३७९१ (०५-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिगाव रेचा अंजनगाव वनपरिक्षेत्रातील (जि.अमरावती) २० वर्षापासून कार्यरत असलेल्या ४ कामगारांना कामावरुन काढल्याने येथील वन मजूरांमध्ये संताप व्यक्त होत असल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या या निर्णयाविरोधात कामगारांनी कुटूंबियांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उपोषणाची दखल घेऊन शासनाने या वन कामगारांना पुन्हा कामावर घेण्याबाबत कोणताही कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-१२-२०२०) :** (१) होय हे अंशत: खरे आहे, अंजनगांव वनपरिक्षेत्रामध्ये विविध योजने अंतर्गत काम करीत असलेल्या ४ मजूरांना महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ मधील मुद्दा क्रमांक ११ नुसार सन १९-२० मध्ये सलग तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी कामावर ठेवू नये, अशी तरतूद असल्याने मजूरांना वनविभागा अंतर्गत कामे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

(२) होय हे खरे आहे, कामावरुन कमी केल्यामुळे ४ मजूरांनी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ पासून दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत व या कार्यालयासमोर दिनांक १४ नोव्हेंबर, २०१९ ते १५ नोव्हेंबर, २०१९ दुपारपर्यंत उपोषण केले आहे.

(३) उपोषणाची दखल घेवून उपवनसंरक्षक, मेळघाट प्रादेशिक वनविभाग परतवाडा यांनी दिनांक १३.११.२०१९ रोजी उपोषणास बसलेले ४ उपोषणकर्ते यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्याच्या प्रयत्न केला. त्यांना शासन निर्णय दिनांक १६.१०.२०१२ मधील तरतुदीनुसार प्राधान्याने कामे देण्यात येईल असे कळविले परंतु उपोषण कर्त्यांनी ही बाब मान्य केली नाही. त्यानंतर पुन:श्च उपवनसंरक्षक, मेळघाट प्रा. वनविभाग, परतवाडा यांनी दि. १५.११.२०१९ रोजी उपोषण कर्त्यांची समजूत काढून वन विभागातील चालू असलेली कामे प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या दिनांक १२.११.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर ४ ही मजूर अंजनगाव परिक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी कामावर आहेत.

(४) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा सुब्बई (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) चिंचोली रिकाष्ट, ओ.सी परियोजना,**
**वेस्टर्न कोल, लि येथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१६) ४९९८ (१५-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सुब्बई (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) चिंचोली रिकाष्ट, ओ.सी परियोजना, वेस्टर्न कोल, लि.कंपनीने ४५१ एकर जमिन दिनांक ८ ऑगस्ट, २०१० रोजी अधिसूचना काढून प्रकल्पासाठी घोषित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापर्यंत सदरहु प्रकल्प बाधित शेतक-यांना त्यांचा जमिनीचा मोबदला व त्यांना करारानुसार प्रकल्पात नोकरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकल्पबाधित शेतकरी सातत्याने आंदोलने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्प बाधित शेतक-यांना सदर कंपनीशी केलेल्या कराराप्रमाणे मोबदला व कंपनीत नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

कोल बेअरिंग ॲक्ट (संपादन आणि विकसन)-१९५७ सेक्शन ४(१) नूसार भारत सरकार राजपत्र दिनांक २० ऑगस्ट २०१० अन्वये जमीन अधिग्रहण करण्यासाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

(२) अजुनपर्यंत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदला व प्रकल्पात नोकरी देण्याबाबत करारनामा करण्यात आलेला नाही.

(३) होय हे खरे आहे.

(४) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदला व प्रकल्पात नोकरी देण्याबाबत करारनामा करण्यात आलेला नाही.

सदर प्रकल्पाकरिता अधिग्रहन अधिसूचित मुल्यांवर वर्धनक्षम (viable) नसल्यामूळे वेकोलीने पत्र क्रमांक ५४१ दिनांक ०६.१०.२०१७ रोजी निर्देशक (तांत्रिक) कोल इंडिया कलकत्ता यांना अधिग्रहन रद्द करण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, मात्र कोळसा मंत्रालयाकडून अद्याप याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

अधिग्रहीत केलेली शेत जमीन आजपर्यंत संबंधीत शेतकऱ्यांच्या ताब्यात आहे आणि शेतकरी शेती करीत आहे. तरी पण हा प्रकल्प सुरु करण्याकरिता प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि वेकोली अधिकारी यांची विभिन्न स्तरावर चर्चा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्यांतील कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१७) ५०९५ (०५-०४-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तीन वीज कंपनीतील शिकाऊ उमेदवार व कंत्राटी कामगारांनी आपल्या प्रलंबित प्रश्नांसाठी नागपूर येथील विधानभवनावर मोर्चा काढला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर मागण्यांचे निवेदन मा.ऊर्जामंत्री यांनी स्वीकारले असून आगामी वीस दिवसात मुंबईत बैठकीचे आयोजन करून चर्चेला बोलवण्याचे आश्वासन दिल्यानंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आल्याची बाब दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अद्याप पर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास राज्यातील तीनही वीज कंपनीतील शिकाऊ उमेदवार व कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांमधील शिकाऊ उमेदवार व कंत्राटी कामगारांच्या संघटनेच्या शिष्टमंडळाने तत्कालीन ऊर्जा मंत्री यांना भेटून निवेदन सादर केले. सदर निवेदनातील मागण्यांबाबत तिन्ही वीज कंपन्यांकडून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**चारगाव धरणातील (ता.वरोरा, जि.चंद्रपुर) येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१८) ६६३१ (०२-०४-२०२०). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारगाव धरणातील (ता.वरोरा, जि.चंद्रपुर) येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्ग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
चारगांव धरणामुळे बाधित झालेल्या गावातील प्रकल्पग्रस्तांचे नवीन गावठाण निर्माण करुन त्याठिकाणी पुनर्वसन करण्यात आलेले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकिय आश्रमशाळांकरिता राबविण्यात येणाऱ्या सेंट्रल किचन योजनेमध्ये राज्यातील पात्र संस्थांना समाविष्ट करण्याबाबत**

**(१९) ६७९९ (१०-०४-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभाग यांचा शासन निर्णय क्र.केंद्रीय २०१८/प्र.क्र.८५/का-१९ दि.१९/१०/२०१८ नुसार शासकिय आश्रमशाळांकरिता ११ प्रकल्पात सेंट्रल किचन योजनेकरिता स्त्री शक्ती संस्थेची (दिल्ली) निवड करण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासन निर्णयानुसार स्त्री शक्ती संस्थेची निवड केलेली असतांना देखील राज्याबाहेरील एका संस्थेस काम सोपविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्त्री शक्ती संस्था, दिल्ली, शासकिय आश्रम शाळांसाठी सेन्ट्रलकिचन योजनेमध्ये सहभागी होण्याची क्षमता तसेच काम करण्यास इच्छुक असतांनाही सन २०१६ च्या शासन निर्णयानुसार कमीत कमी ५० टक्के काम हे महाराष्ट्रातील पात्र संस्थेस द्यावे असे नमुद असतांनाही राज्याबाहेरील संस्थेस देण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्याबाहेरील संस्थेस दिलेल्या कामास तात्काळ स्थगिती देऊन महाराष्ट्रातील पात्र संस्थांना सदर योजनेत सहभागी करुन घेण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१९-११-२०२०) :** (१), (२) व (३) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि. १९/१०/२०१८ अन्वये शासकीय आश्रमशाळांकरिता घोडेगाव, नंदुरबार व जव्हार या ३ प्रकल्पांतर्गत मध्यवर्ती स्वयंपाकगृह या योजनेची अंमलबजावणी स्त्री शक्ती या संस्थेमार्फत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. स्त्री शक्ती ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत बृहनमुंबई विभाग, मुंबई येथील सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयातील नोंदणीकृत संस्था आहे.
(४) व (५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### सामाजिक वनीकरण अकोला विभागातील रोपवनाचे व इतर केलेल्या कामांची देयके मजूर संस्थांनी मजुरांच्या खात्यात जमा करण्याबाबत

**(२०) ६८७२ (०३-०४-२०२०). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक वनीकरण विभागातील रोपवनाचे व इतर केलेल्या कामांची देयके मजुरांच्या खात्यात जमा करण्याबाबत मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने याचिका क्र.४९८५ /२०१६ दिनांक ३१/८/२०१६ रोजीच्या अनुषंगाने आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार सहकार व पणन विभागाणे दिनांक ३१-८-२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबधित विभागास आदेशीत केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ,सामाजिक वनीकरण अकोला विभागातील रोपवनाचे व इतर केलेल्या कामांची देयके मजूर संस्था मजुरांच्या खात्यात जमा करत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-१२-२०२०) :** (१) व (२) मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठने याचिका क्र.४९८५/२०१६ प्रकरणी दि.३१/२/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दि.२१.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मजूर सहकारी संस्थेने सभासदांची कामाबद्दलची मजुरी त्यांच्या बँक खात्यात धनादेश/Electronics Clearance (E.C.) द्वारे जमा करावी अशा सूचना जारी केल्या आहेत.
(३) व (४) अकोला सामाजिक वनीकरण विभागांतर्गत १४ मजूर सहकारी संस्थांना वनीकरणाची कामे देण्यात आली होती. संबंधित मजुर सहकारी संस्थांनी मजुरांच्या खात्यात मजुरी जमा केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी या संदर्भात दि.२१.०१.२०१७ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांना कळवण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

___

**पुणे जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डातील समस्यांबाबत**

**(२१) ७४६९ (०५-०४-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डाच्या आवारात चोरीच्या घटना, अस्ताव्यस्त उभ्या केलेल्या गाडया तसेच समाजकंटकांच्या उपद्रवामुळे बाजार घटकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत प्रशासनाने दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बाजार आवारातील कामकाज सुलभ, सुरक्षित, स्वच्छ व वाहतूक सुरळीत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२०) :**(१) व (२) हे अशंत खरे आहे.

बाजार समिती प्रशासन गरजेनुसार बैठका आयोजित करीत असतात. कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणेच्या फळे व भाजीपाला आवारातील प्रचलित बाजार व्यवस्थेत बदल करून दिवसेंदिवस वाढणारी शेतीमालाची आवक, वाहनांची संख्या यांचे योग्य नियमन करून वाहतूकीची सुरळीतता, स्वच्छता व सुरक्षिततेसाठी अभियान राबवून बाजार व्यवस्था अद्यावत करणेसाठी दि.१७.१२.२०१९ रोजी बाजार घटकांच्या संघटनेच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन बाजार आवारात कोणत्या गोष्टींची अंमलबजावणी करावयाची आहे याकरीता दि.२३.१२.२०१९ रोजी बैठक घेऊन दि.२७.१२.२०१९ पासून अभियान राबविणेचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी व गैरआदिवासी अतिक्रमण धारकांना कायमस्वरूपी पट्टे देण्याबाबत**

**(२२) १००३७ (०३-०६-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी, गैरआदिवासी व इतर अतिक्रमण धारकांना कायमस्वरूपी पट्टे मिळण्यासाठी शासनाने तीन पिढ्यांची अट रद्द करावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी, जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२३-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नाधिन निवेदन प्राप्त झालेले नाही.मात्र सदर बाब केंद्र शासन स्तरावरील असल्यामुळे तीन पिढ्याची अट रद्द करण्याबाबत दि.२४/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील राखीव वन सर्व्हे नं. ९६ च्या क्षेत्रातील ५.७१२ हे.आर क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(२३) ११३४६ (१३-०७-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील राखीव वन सर्व्हे नं. ९६ च्या क्षेत्रातील ५.७१२ हे.आर क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याचे माहे जून-२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अतिक्रमित क्षेत्रापैकी २.६८६ हे. वनक्षेत्र वन विभागाने ताब्यात घेतले असून सदरचे क्षेत्र अद्यापपर्यंत संरक्षित केले नसल्याने अतिक्रमणाचा धोका निर्माण झाला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२५-११-२०२०) :** (१) मौजे वारजे, ता.हवेली, जि.पुणे येथील राखीव वन सर्व्हे नं. ९६ च्या ५.७१२ हे.आर क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याचे सन २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) वन विभागाने ताब्यात घेतलेल्या वनक्षेत्रावर सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच वनक्षेत्राच्या हद्दी लगत जेसीबी मशीनच्या सहाय्याने जलशोषक चर खोदण्यात येऊन सदरचे क्षेत्र संरक्षित करण्यात आले आहे.
(३) मौजे वारजे सर्व्हे नं. ९६ मधील अतिक्रमकांविरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ (१),(डी),(एफ),(एच), कलम ६३(सी) सहकलम ६५ (अ) नुसार व प्रिव्हेनशन ऑफ डॅमेज टू पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट, १९८४ चे कलम ३ नुसार वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. अतिक्रमणधारकांविरुद्ध मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर, पुणे यांच्या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

वन विभागाच्या कार्यवाही विरुध्द काही अतिक्रमणधारकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.९३२३/२०१९ दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने जैसे थे आदेश दिले आहेत. प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कोरोना व अवकाळी पाऊस यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२४) ११४१९ (०७-१०-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक, अमरावती, औरंगाबाद, पुणे विभागात दिनांक २ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या अवकाळी पाऊसामुळे तसेच जळगाव, बीड, अहमदनगर, सोलापूर, बुलढाणा या जिल्ह्यांत झालेल्या गारपिटीमुळे सुमारे दोन हजार ८२० हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नुकसानीचे सविस्तर पंचनामे शासनाकडून करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, सदरहू पंचनाम्यानुसार अवकाळी पाऊस आणि गारपीट यांमुळे बाधित झालेल्या किती शेतकऱ्यांना शासनाकडून आजतागायत नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-११-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) माहे फेब्रुवारी, २०२० ते मे, २०२० या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे शेतीपिकांचे नुकसानीकरिता मदत देण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत.

---

## राज्यातील अनेक जिल्ह्यात गारपीट व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत

**(२५) ११४७० (१५-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांत गारपीट व अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्यामुळे या नुकसानीचे पंचनामे करून याबाबतचा अहवाल शासनास पाठविण्याचे निर्देश महसूल मंत्री यांनी दिनांक २५ एप्रिल, २०२० रोजी त्यासुमारास सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयानुसार अ, ब, क, ड, नमुन्यातील संयुक्त पंचनामे अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनास प्राप्त झाले आहे काय,
(३) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-११-२०२०) :** (१) होय, खरे आहे,
(२) होय, खरे आहे,
(३) राज्यात माहे फेब्रुवारी-मार्च, २०२०, एप्रिल व मे, २०२० या कालावधीत गारपीट व अवकाळी पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीचे अहवाल कृषी आयुक्त, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाले असून निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेनुसार रक्कम अदा करण्याबाबत

**(२६) ११५६८ (१३-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेनुसार जाहीर केल्याप्रमाणे माहे एप्रिल, २०२० पर्यंत अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील एक लाख १७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात माहे मे २०२० पर्यंत हे अनुदान जमा झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांचा अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेचा लाभ मे, २०२० पर्यंत देण्याचे प्रस्तावित होते. परंतू, मार्च, २०२० पासून कोविड १९ महामारीचा प्रादूर्भाव झाल्याने टाळेबंदीमुळे सर्व शेतकऱ्यांना लाभ देता आला नाही. कोल्हापूर जिल्हयातील ४६,५९१ शेतकरी योजनेसाठी पात्र आहे. त्यापैकी ४०,९९४ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर रु. २४२.२३ कोटीचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत पात्र कर्जखात्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील संवर्गनिहाय रिक्त पदांबाबत

**(२७) ११६०७ (१३-०९-२०२०). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयात राज्य उत्पादन शुल्क विभागातील संवर्गनिहाय एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे जिल्हयाच्या कामकाजावर व शासनाच्या महसुली उत्पादनावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून तातडीने रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०१-१२-२०२०) :** (१) जिल्हयात अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या अधीनस्त संवर्गहनिहाय एकूण ४५ पदे मंजूर आहेत. या संवर्गनिहाय मंजूर पदांपैकी २९ पदे भरलेली असून १६ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) हे खरे नाही. विभागातील रिक्त पदांचा आढावा घेउन त्या पदांवर इतर उपलब्ध अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात येउन कामकाज सुलभतेने होण्याबरोबर शासनाच्या महसूली उत्पादनावर परिणाम होणार नाही याची खबरदारी घेण्यात येत आहे. रिक्त पदांबाबत शासन धोरणानुसार यथास्थिती पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी बांधवाना दिली जाणारी खावटी कर्जाचा रक्कमेत वाढ करण्याबाबत**

**(२८) ११६७४ (१९-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी बांधवांना दिली जाणारी खावटी कर्जाची रक्कम अतिशय तुटपूंजी असून या कर्जाच्या रक्कमेत वाढ करण्यात यावी अशी मागणी आदिवासी बांधवांकडून करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर आदिवासी बांधवांसाठी खावटी कर्जाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत शासन अनुकूल आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२४-११-२०२०) :** (१) व (२) राज्यात कोरोना विषाणुच्या पार्श्वभूमीवर आदिवासी लाभार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजनेस दि.०९.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर खावटी अनुदान योजना ही अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांच्या लाभार्थ्यांसाठी १०० टक्के अनुदान म्हणून राबविली जाईल. त्याअंतर्गत एकूण ११.५५ लक्ष लाभार्थी कुटूंबियांना रु.४,०००/- इतका लाभ अनुज्ञेय राहील. यामध्ये ५० टक्के (रु.२,०००/-) हे वस्तुरुपाने, तर ५० टक्के (रु.२,०००/-) हे रोखस्वरुपात लाभार्थी कुटूंबाच्या थेट बँक/पोस्ट खात्यात वितरीत करण्यांत येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत छोटे आकाराचे भूखंड वितरीत करण्याबाबत**

**(२९) ११७०६ (२०-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३४०० चौ.मीटर आकाराचा भूखंड वाटपासाठी नव्याने निविदा काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघुउद्योजकांना व्यवसाय करता यावा, त्यांना औद्योगिक परिसरात जागा उपलब्ध व्हावी व नवीन उद्योग वाढावेत, या उदेशाने शासनाकडून भूखंडाचे वाटप केले जाते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून वाटपासाठी काढण्यात आलेल्या भूखंडाचे आकारामुळे सदर भूखंडाची खरेदी लघुउद्योजकांना परवडणार नसल्याने सदर निविदा रद्द करून २०० ते १००० चौ.मीटर आकाराचे भूखंड करिता निविदा काढण्याची मागणी पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या अध्यक्षांनी कित्येक वर्षापासून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन छोट्या आकाराचे भूखंड वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: हे खरे आहे.
(४) महामंडळाचे परिपत्रक दिनांक १/३/२०१९ नुसार MSEME प्रवर्गांतर्गत प्राधान्याने भूखंड वाटपाबाबत व परिपत्रक दिनांक १३/८/२०१९ अन्वये सुक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामूहीक गटास भूखंड वाटप करणेबाबत धोरण निर्गमित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली वन विभागाच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(३०) ११७८९ (१८-०८-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली वन विभागाअंतर्गत येणाऱ्या वनपरिक्षेत्रात रेती, शेणखत व माती पुरविणाऱ्या ई-निविदा प्रक्रियेत निविदा एका व्यक्तीच्या नावे व खरेदी मात्र दुसऱ्या व्यक्तीकडून करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन परिक्षेत्र अधिकारी गडचिरोली यांनी कंत्राटदाराला रेती, माती व शेणखत पुरवठा करण्याचे आदेश दिले तथापि आदेशापूर्वी साहित्य पुरविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वनपरिक्षेत्र अधिकारी हे ई-निविदा प्रक्रियेमध्ये दुसऱ्या व्यक्तीशी संगनमत करुन निविदा प्रक्रियेपुर्वीच साहित्य देत असल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळुन आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-१२-२०२०) :** (१) (२) व (३) हे खरे आहे.
गडचिरोली वन विभागात सन २०१९ मध्ये रेती, शेणखत व माती पुरविण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेत निविदा मंजूर करण्यात आल्या होत्या. तथापि, वनपरिक्षेत्र अधिकारी, चातगाव यांनी मंजूर निविदाधारकाऐवजी स्थानिक पुरवठाधारकाकडून खरेदी केली आहे. सदरच्या साहित्याचा पुरवठा आदेशापूर्वीच झालेला आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी केली असून वन परिक्षेत्र अधिकारी, चातगांव (तत्कालीन) यांना जून २०२० मध्ये निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरूध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी कुटुंबासाठी खावटी कर्ज योजना ऐवजी खावटी योजना जाहिर करण्यात आल्याबाबत**

**(३१) १२०८८ (१५-०९-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी कुटुंबासाठी खावटी कर्ज योजना तत्कालीन शासनाने बंद केल्यामुळे राज्यातील आदिवासी कुटुंबासाठी खावटी कर्ज ऐवजी खावटी योजना जाहीर करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचा लाभ आदिवासी समाजासह इतर समाजातील गरजुंना सुध्दा देण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेचा साधारण १५ लाख कुटुंबांना (६० लाख) लाभ होणार असुन प्रत्येक कुटुंबास ३००० रुपये लाभ व ५०% रकमेच्या जिवनावश्यक वस्तु देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी केव्हापासुन करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२४-११-२०२०) :** (१) होय.
सध्या कोविड विषाणुमुळे निर्माण झालेली आपात्कालीन परिस्थितीमध्ये अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांना मदत देण्यासाठी १०० टक्के अनुदानित योजना १ वर्षासाठी (सन २०२०-२१) पुनश्च सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. सदर योजनेचा लाभ फक्त आदिवासी समाजासाठी देण्यात येणार आहे.
(३) सदर शासन निर्णयानुसार ११.५५ लक्ष अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रति कुटूंब रु.४,०००/- इतका लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यातील रु.२,०००/- हे वस्तु स्वरुपात (जिवनावश्यक वस्तु) व रु.२,०००/- हे रोखस्वरुपात थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत.
(४) सदर योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दि.३०.०९.२०२० रोजी निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. याअनुषंगाने लाभार्थ्यांचे सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यामध्ये असून सर्वेक्षण पूर्ण होताच ५० टक्के (रु.२,०००/-) सर्व लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात जमा करण्यात येणार आहे. तसेच ५० टक्के (रु.२,०००/-) वस्तुस्वरुपात (जिवनावश्यक वस्तु) द्यावयाच्या मदतीबाबत निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेतकरी व तरुण उद्योजक यांना बँका कर्ज उपलब्ध करुन देत नसल्याबाबत

**(३२) १२१९३ (२०-०९-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या महामारी संकटामुळे शेती व्यवसायासह लघु-मध्यम उद्योग करणारे नागरिकांवर मोठे आर्थिक संकट कोसळल्यामुळे अडचणीत असलेल्या शेतकरी तसेच तरुणांना बँकांनी कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या सुचना शासनाने दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक कर्ज वाटप तसेच तरुणांना उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज वाटप संथ गतीने सुरु असून राज्य शासनाने दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिलेल्या शेतकऱ्यांनाही बँकाकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे अनेकांना कर्ज मिळण्यापासून वंचित राहवे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चालु वर्षाच्या खरीप हंगामासाठी सोलापूर जिल्ह्यात पिक कर्ज वाटपासाठी अग्रणी बँकेनी सुमारे १४०० कोटी रुपयांचा पत आराखडा तयार करुन संबंधीत बँकांना उद्दीष्टे दिलेली आहेत. मात्र उद्दीष्टाच्या कर्ज तुलनेत वाटप अत्यंत कमी आहेत. याचबरोबर लहान मोठे उद्योगासाठी तरुण उद्योजक बँकेत कर्जासाठी हेलपाटे मारत असून बँका त्यांना विविध कारणे देत आहेत. त्यामध्ये कर्जमाफी च्या लाभार्थ्यांना नव्याने कर्ज देण्याबाबत परिपत्रक नाही, ज्यांना कर्जमाफी होऊन कर्ज नसल्याचा दाखला आहे त्यांनी सर्च रिपोर्ट द्यावा, उद्योग धंदयासाठीच्या कर्जाला नंतर या अशी अनेक कारणे देऊन कर्ज नाकारत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने तातडीने दखल घेऊन अडचणीत असलेल्या शेतकरी व तरुणांना कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत असलेल्या १६५ आश्रमशाळांचे तपासणी अभावी अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३३) १२२५५ (१७-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील "अ" श्रेणी प्राप्त केलेल्या ४० व "ब" श्रेणी प्राप्त ५६ व सन २०१५ मध्ये तपासणीस असहकार दर्शविलेल्या ६९ अशा १६५ आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत कार्यवाही

करण्यासाठी दिनांक ८ मार्च २०१९ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाने आदेश जारी केले होते तद्नुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत १६५ आश्रमशाळांची तपासणी करण्याबाबचे आदेश माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना दिल्यानंतर दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास तपासणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आदेश दिल्यानंतरही तपासणी करण्यास विलंब केल्याने आश्रमशाळांना अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रमशाळांची तपासणी करण्यास विलंब झाल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन १६५ आश्रमशाळांना तात्काळ अनुदान देण्याबाबत व पुणे जिल्ह्यातील आश्रमशाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-१२-२०२०) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीपाचे कर्ज मिळण्यास अडचणी येत असल्याबाबत**

**(३४) १२२९३ (२०-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जाहीर केलेली महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजनेतंर्गत अहमदनगर जिल्यातील सुमारे ३६ हजार शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण न केल्याने शेतकऱ्यांच्या नावासमोर थकबाकी दिसुन येत असल्यामुळे त्यांना पीक कर्ज मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार थकबाकी असल्याने शेतकऱ्यांना खरीपाचे कर्ज मिळण्यास अडचण येऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ अंतर्गत माहे एप्रिल, २०२० मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील २.४९ लाख कर्जखात्यांचे प्रमाणीकरण करण्यात आले असून ३७,२४० कर्जखात्याचे प्रमाणीकरण बाकी होते.

(२) व (३) सदर योजनेची अंमलबजावणी सुरु असतांना मार्च, २०२० मध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या प्रादूर्भावामुळे लॉकडाऊन झाले असल्याने आधार प्रमाणीकरण प्रक्रिया थांबविण्यात आली. त्यादरम्यान महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत मे, २०२० पर्यंत ज्या लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला नाही, अशा शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम शासन येणे दर्शविण्यासंबंधी दिनांक २२.०५.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

तद्नंतर आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यात आली. मार्च, २०२० ते ऑगस्ट, २०२० अखेर अहमदनगर जिल्ह्यातील २.८६ लाख कर्जखात्यांचे प्रमाणीकरण करण्यात आले असून ३,५४१ कर्जखात्याचे प्रमाणीकरण बाकी आहे. प्रमाणीकरण झालेल्या कर्जखातेदारांपैकी २.६५ लाख शेतकऱ्यांना रु. १६१२.७४ कोटीचा लाभ देण्यात आला असून लाभ मिळालेल्या कर्जखातेदारांपैकी १.१९ लाख कर्जखातेदारांना रु.६९१.०६ कोटीचे कर्जवाटप करण्यात आले, तसेच उर्वरीत पात्र इच्छूक शेतकऱ्यांना त्यांचे मागणीनुसार तातडीने कर्जवाटप बँक/संबंधीत विविध कार्यकारी सहकारी संस्था यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील देय व्याज रक्कम सेवा संस्थेला अदा करण्याबाबत**

**(३५) १२३७४ (१७-०८-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्प मुदत पीक कर्जाचे वाटप करताना विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना जिल्हा बँकेमार्फत चार टक्के व्याज दराने तसेच सेवा संस्थेमार्फत सभासदांना सहा टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करण्यात येत असुन, कर्ज वसुलीतुन प्राप्त होणाऱ्या दोन टक्के व्याजरुपी उत्पन्नातून सेवा संस्थेचे कामकाज चालते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ मधील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने अंतर्गत बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस प्राप्त झालेल्या कर्ज माफीच्या रक्कमेतून विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना देय असलेली व्याज गाळा रक्कम अद्याप बँकेने सेवा संस्थेला दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी बीड जिल्ह्यातील गट सचिवांनी दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले तसेच दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी विभागीय सह निबंधक, लातूर यांनी कलम ७९ अन्वये आदेश देऊनही बँकेने रक्कम अदा करण्यास विलंब केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेवा संस्थेला गाळा रक्कम व्याजासह अदा करण्याबाबत तसेच बँकेच्या संचालक मंडळाविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-१२-२०२०) :** (१), (२) व (३) होय.
(४) सदर प्रकरणी जिल्हा उपनिबंधक कार्यालय, बीड यांनी ४७९ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंतचे लेखापरिक्षण अहवाल जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बीड यांचे विनंतीवरुन बँकेस सादर केले आहेत. या लेखापरिक्षण अहवालाची त्वरीत तपासणी करुन व्याज गाळा रक्कम विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या खात्यात जमा करुन त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी दिनांक १०.०६.२०२० च्या पत्रान्वये बँकेस सूचित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड कृषी उत्पन्न बाजार समितीने शासन निर्णयाचे पालन न करता सेवानिवृत्त सचिव यांची केलेली नियुक्ती**

**(३६) १२४२२ (१७-०९-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेले गैरव्यवहार दडपण्यासाठी सभापती, उप सभापती व संचालक मंडळ यांनी संगनमत करुन शासन निर्णयाचे पालन न करता तसेच पणन महासंघाची मान्यता न घेता सेवानिवृत्त असलेले श्री.दामोदर शिनगारे यांची सचिव पदी बेकायदेशीर नियुक्ती केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार व पणन मंत्री यांना अग्रेषित करुन त्याची प्रत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांना दिनांक ३१ मे, २०२० रोजी दिले असता उपनिबंधक सहकारी संस्था यांनी चौकशीचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी केलेल्या चौकशी अहवालात शासन निर्णयाचे उल्लंघन करून शासन निर्णय दि.१०.१२.२०१६ नुसार विशिष्ट कारणासाठी करार पद्धतीने नेमणुक न करता श्री.शिनगारे यांची सचिव म्हणून नियुक्ती केल्याचे निदर्शनास आले असल्याने बाजार समितीने तात्काळ श्री.शिनगारे यांना नियमीत सचिव पदावरून कार्यमुक्त करावे असे आदेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी दिनांक १८ जून, २०२० रोजी दिलेले असतांनाही सभापतींनी त्याची अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सभापती, उपसभापती व संचालक मंडळ यांच्या संगनमताने झालेल्या सचिवाच्या बेकायदेशीर नियुक्ती व इतर गंभीर बाबी प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२०) :** (१) अशंत: खरे आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी दि.१०.०२.२०२० रोजी झालेल्या संचालक मंडळ सभा ठराव क्र.३ नुसार बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाजात सुसूत्रता आणणेसाठी उत्पन्नाचे नुकसान टाळणेसाठी विवक्षीत स्थिती विचारात घेऊन अनुभवी व सक्षम सचिव म्हणून श्री.दामोधर दशरथ शिनगारे यांना पुढील स्थायी व्यवस्था होईपर्यंत सचिव पदाचा पदभार सोपवून मान्यता घेणेबाबतचा बाजार समितीचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करण्यात आला आहे.

(२) (३) व (४) मा.श्री. संदिप रविंद्र क्षीरसागर, विधानसभा सदस्य यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक ०९.०६.२०२० च्या पत्रान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. दिनांक १६.०६.२०२० रोजी सादर केलेल्या अहवालात सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार विवक्षित कामासाठीच करारपध्दतीने नियुक्ती करता येते मात्र सदर प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी श्री.दामोदर दशरथ शिनगारे यांचेकडे नियमित सचिव पदाचा पदभार दिलेला असल्याने सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ चे उल्लंघन कृषी उत्पन्न बाजार समितीने केले असल्याचे नमुद आहे. सदर अहवालाच्या विरूध्द कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन (एस.टी) नं.१०८८८/२०२० दाखल केलेली आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.२०.०७.२०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्यात आली असून सदर प्रकरण न्यायपविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पी.एम.सी. बँकेच्या खाते धारकांना रक्कम मिळण्याबाबत**

**(३७) १२४६७ (१७-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पी.एम.सी. बँकेच्या खातेधारकांना त्यांच्या हक्काचे व कष्टाचे पैसे अद्याप मिळाले नसल्याने अनेक खातेधारकांवर उपासमारीची वेळ आलेली असून काही जणांनी जीव गमावल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार किती खातेधारकांनी जीव गमावला असून किती खातेधारकांची किती रक्कम बँकेकडे जमा आहे व सदरची रक्कम लवकरात लवकर खातेधारकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-१२-२०२०) :** (१), (२) व (३) पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि., मुंबई या बँकेची नोंदणी बहुराज्जीय सहकारी संस्था कायदा, २००२ अंतर्गत झालेली आहे. सदर बँकेचे निबंधक हे केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली असल्यामुळे सदर बँक ही वैधानिकदृष्ट्या त्यांच्या कार्यकक्षेत येत असल्याने बँकेवर कार्यवाही करण्याचे सर्व प्रशासकीय अधिकार केंद्रीय निबंधक यांना आहेत. बहुराज्जीय संस्थाबाबत बहुराज्जीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४ (४) अन्वये लवाद नियुक्ती करण्याव्यतिरीक्त इतर कोणतेही वैधानिक अधिकार राज्याच्या निबंधकांना नाहीत.

सध्यस्थितीत, सहकार आयुक्त व निबंधक, म. रा., पुणे यांच्या दि. ०४.११.२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री. के. जे. परतवार यांची पी.एम.सी. बँकेवर लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील औद्योगिक विकास महामंडळतील भुखंड नवीन उद्योजकांना वितरीत करण्याबाबत

**(३८) १२५३१ (२०-०९-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील औद्योगिक विकास महामंडळाने मागील अनेक वर्षापासून उद्योगांकरीता भूखंड वितरीत केले असून, त्यावर सुरु असलेले उद्योग मागील अनेक वर्षापासून बंद असल्याची बाब दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील औद्योगिक विकास महामंडळाने मात्र बिर्ला कॉटसिन या एकमात्र कंपनीला अनेक भूखंड वितरीत केले असून सदर कंपनी बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त औद्योगिक विकास महामंडळामार्फत कॉटसिन कंपनीला व उद्योजकांना किती क्षेत्रफळाचे भूखंड उद्योग विकसित करण्याकरीता वितरीत केले असून, सद्य:स्थितीत किती उद्योग सुरु आहेत व किती भूखंड रिक्त आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वितरीत करण्यात आलेले परंतु उद्योग सुरु न झालेले भूखंड इतर उद्योजकांना वितरीत करुन नवीन उद्योगांना चालना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२४-११-२०२०) :** (१) होय,हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर उद्योगास ३ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून सदरची कंपनी सद्यस्थितित बंद आहे.

(३) बिर्ला कॉटसिन कंपनीला ३ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्याचे क्षेत्र ४० हे.आर इतके आहे. मलकापूर औद्योगिक क्षेत्रात २२९ भूखंड आरेखित करण्यात आले असून उद्योजकांना १५२.०७ हे.आर क्षेत्रफळाचे १७३ भूखंड वितरीत केले आहेत व ५६ भूखंड रिक्त आहेत. सद्यस्थितीत त्यापैकी उद्योग सुरू असलेले ५१ भूखंड आहेत.तसेच उद्योग सुरू होउुन बंद असलेले उद्दयोग ४७ आहेत आणि बांधकामाखाली ५ भूखंड आहेत. विकास कालावधी शिल्लक असलेले भूखंड २८ आहेत आहेत. सद्यस्थितीत त्यापैकी उद्योग सुरू असलेले ५१ भूखंड आहेत.

(४) वितरीत भूखंडापैकी कालावधी संपलेले ४२ भूखंड परत घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच रिक्त ५६ भूखंड जाहीरात देऊन वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यात तुळजापूर-नांदेड-नागपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी अवैध गौणखनिज (मुरुम) उत्खनन होत असल्याबाबत

**(३९) १२६३५ (१२-१०-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात तुळजापूर-नांदेड-नागपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी खाजगी जमीनीतून शेत सर्व्हे नं. २१/१ मधून मुरुम उत्खननाचा परवाना असतांना वनपरिक्षेत्र प्रादेशिक कार्यालय हदगांव अंतर्गत मनाठा राखीव वनक्रंमाक ४९२ मध्ये अवैध उत्खनन केले आहे. सदर उत्खननाची तक्रार काही सामाजिक कार्यकर्त्यांनी तहसिल कार्यालयाकडे केली असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने सदर उत्खनन हे अवैध असल्यामुळे वनधिकारी यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ कलम २६ (१) (डइग) नुसार संबंधितावर प्रथम गुन्हा नोंद करुन दोन पोकलँन/मशिन, ७ हायवा,टिपर जायमोक्यावर जप्त करुन ही वाहने वनपरिमंडळ अर्धापूर येथे ठेवण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर ठिकाणी अनधिकृत उत्खनन करणा-या संबंधित कंपनीकडून दंड वसूल केला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करून पूर्ण करून संबंधित कंपनी विरूध्द गुन्हा क्र.०२/२०२०, दि.२५.०१.२०२० नोंदविण्यात आला व दोषी आरोपींविरूध्द मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय, हदगाव यांचे न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले. मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे एकूण रू.५५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

मा.न्यायालयाने दिलेली शिक्षा पुरेशी नसून आरोपींना कडक शिक्षा होणेकरीता वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात होत असलेली वृक्षतोड

**(४०) १२७६३ (१३-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग)तालुक्यात वृक्षतोड करण्यात बंदी असतानाही सर्व नियम डावलून वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून गत अनेक महिन्यांपासून या परिसरात सर्रासपणे जंगल माफियांकडून वृक्षतोड होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जंगल माफियांकडून सर्रासपणे बेकायदा धरण परिसरात धरणाच्या जलाशयाच्या बाजूला शेकडो झाडांची कत्तल केली जात असताना कोंडाळ वन विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने या भागातील डोंगर खचून पुन्हा धरणाच्या जलाशयात वाहून येण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) तिलारी धरण परिसरात मोठ्या प्रमाणात जमिनी खाजगी लोकांना तसेच परप्रांतीयांना विक्री केल्या आहेत पण या जमिनी डोंगर भागात असून तेथे मोठ्या प्रमाणात मोठमोठी जंगली झाडे ही वनखात्याच्या राखीव जंगलात लागून आहेत काही संपादित क्षेत्र आहे तेथेही वृक्षतोड खुलेआम सुरू आहेत तेथे जाण्यासाठी धरणाच्या जलाशयात बोटींचा वापर करून जावे लागते व रिंग रोड कामही अपूर्णावस्थेत रखडलेले असल्याने येथे वाहने जाऊ शकत नसल्यामुळे त्याचा फायदा घेत बाहेरील जंगल माफिया बेकायदा वृक्षतोड करीत आहेत,
(४) दोडामार्ग तालुक्यातील तिलारी धरण परिसरात मागील अनेक वर्षापासून प्रचंड प्रमाणावर वृक्षतोड होत असतानाही वनविभागाकडून आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास सदरहू बेकायदा वृक्षतोडीस आळा घालणाच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (११-११-२०२०) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) विनापरवाना वृक्षतोड संदर्भात क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी यांचेमार्फत नियमानुसार वेळोवेळी कारवाई करणेत येत आहे. प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात लॉकडाऊन काळात उद्योगधंदे बद असल्याने**
**२४० कोटी रुपयांचा महसूल बुडाल्याबाबत**

**(४१) १२८३७ (२०-०९-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्ग रोखण्यासाठी केलेल्या संचारबंदीमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील बाजारपेठे बंद असल्याने सुमारे २४० कोटी रुपयांचा महसूल शासनास मिळाला नसल्याची बाब दिनांक २ जून २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात लॉकडाऊनमध्ये शिथिलता देवून उद्योगधंदे सुरू करण्यास दिनांक १८ मे, २०२० पासून परवानगी दिल्यानंतर लघु व मध्यम तथा मोठे अशा ३ हजार २०० कंपन्यांना परवाने देवूनही त्यातील कौशल्यपूर्ण कामगारांच्या कमतरतेमुळे फक्त १ हजार ५२३ उद्योगधंदे सुरु करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील कौशल्यपूर्ण कामगारांच्या गरजेचा विचार करुन कामगार निर्मितीसाठी दिर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२०-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक २५ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन लागू केला आहे. सदर लॉकडाऊन काळात चंद्रपूर जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील फक्त अत्यावश्यक सेवेतील उद्योग सुरु होते.

केंद्र शासनाच्या दिनांक १५ एप्रिल, २०२० च्या आदेशान्वये अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक २० एप्रिल, २०२० पासून महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील उद्योग सुरु करण्यास परवानगी देण्यात आली. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर यांना उद्योग सुरु करण्यास परवानगी देण्याचे निदेश दिले. या निदेशांना अनुसरुन उद्योजकांना परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परवानगीसाठी दिनांक २४ एप्रिल,२०२० पासून http://permission.midcindia.org ऑनलाईन पोर्टल तयार केले व संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने उद्योजकांना ऑनलाईन परवानग्या देण्याबाबत कार्यवाही केली आहे.

(२) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हयातील मोठे व मध्यम उद्योग लॉकडाऊनच्या सुरुवातीच्या काळात बंद करण्यात आले होते. त्यानंतर केंद्र शासनाच्या दिनांक १५एप्रिल, २०२० च्या आदेशान्वये अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक २० एप्रिल, २०२०पासून महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील सतत प्रक्रिया (continuous process) असलेले उद्योग सुरु ठेवण्याचे निदेश दिले. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या परवानगीने ग्रामीण भागातील व एमआयडीसी क्षेत्रातील सतत प्रक्रिया (continuous process) असलेले उद्योग सुरु करण्यात आले.

(३) शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातर्फे mahajobs portal विकसित करुन त्यावर मध्यम, मोठे व विशाल उद्योजकांकडून त्यांच्या उद्योगांत आवश्यक कुशल व अकुशल कामगारांची नोंदणी करण्यासाठी मा.पालकमंत्री, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ जून, २०२० व दिनांक १० जुलै, २०२० रोजी उद्योजकांच्या सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर यांनी उद्योजकांशी समन्वय साधून, दिनांक २३ जुलै, २०२० रोजी महारोजगार मेळावा आयोजित केला होता.
(४) लागू नाही.

---

**मुंबई उपनगरात पर्यटनाच्या वाढीसाठी आणि कांदळवनांच्या विकासासाठी गोराई आणि दहिसर येथे कांदळवन उद्यान उभारण्याबाबत**

**(४२) १३०१३ (२०-०९-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरात पर्यटनाच्या वाढीसाठी आणि कांदळवनांच्या विकासासाठी गोराई आणि दहिसर येथे कांदळवन उद्यान उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापर्यत होणे अपेक्षित आहे व त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-१२-२०२०) :** (१) मौजे गोराई (बोरीवली) न.भु.क्र.८८३ येथे ८ हेक्टर तसेच मौजे दहिसर न.भु.क्र.३१२९ ते ३१३८ येथे ३० हेक्टर आर असे एकूण ३८ हेक्टर क्षेत्रावर कांदळवन उद्यानाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) प्रस्तावित दोन्ही प्रकल्पास MCZMA, SEIAA वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत तत्वत: मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच सदर प्रकल्पास निसर्ग पर्यटन मंडळ व मा. उच्च न्यायालयाची देखील परवानगी प्राप्त झाली असून दोन्ही प्रकल्पाच्या कामास तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे.

गोराई येथील कांदळवन उद्यानाबाबत प्राप्त निविदांना मान्यता देणे व दहिसर येथील उद्यानाबाबत प्रशासकीय मान्यता देणे या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. मौजे गोराई (बोरीवली) येथील प्रकल्प २६.९७ कोटी रुपयांचा असून सदर प्रकल्पांतर्गत निसर्ग माहिती केंद्र, कांदळवन संग्रहालय, बोर्डवॉक, नौका विहार या बाबी प्रस्तावित आहेत. तर मौजे दहिसर येथील प्रकल्प ४४.८० कोटी रुपयांचा असून सदर प्रकल्पांतर्गत निसर्ग माहिती केंद्र, कांदळवन संग्रहालय, बोडवॉक, पक्षी निरीक्षण मनोरा आणि नौका विहार या बाबी प्रस्तावित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माळीण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पुणे जिल्ह्यातील २३ गावे धोकादायक असल्याबाबत

**(४३) १३२४८ (२२-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पुणे जिल्ह्यातील २३ गावे धोकादायक असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी अनेक गावात सुविधा निर्माण करून देण्यात आलेल्या असल्या तरी अद्याप १७ गावांना धोका असल्याचे सर्वेक्षणात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, खेड तालुक्यातील भोमाळे, पदरवाडी, भोरगिरी या गावांना अद्यापही शासनाकडून कोणत्याही सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२३-११-२०२०) :** (१) होय.

(२) पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील २३ गावांपैकी ५ गावांची संरक्षणात्मक कामे पूर्ण झाली आहेत. तसेच २ गावांचे संरक्षणात्मक कामे करण्याची गरज नसल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कळविले आहे. उर्वरीत १६ गावांचे पुनर्वसन करण्याचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) खेड तालुक्यातील भोमाळे, भोरगिरी अंतर्गत पदरवाडी गावातील ग्रामस्थांनी कामास विरोध करुन कायम स्वरुपी पुनर्वसन करणेची मागणी केली आहे. वरील १६ गावात या गावांचा समावेश आहे.

---

## मौजे गुंडेगाव (ता.जि.अहमदनगर) वनक्षेत्रात बांधण्यात आलेले माती बंधारे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(४४) १३२५० (२२-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुंडेगाव (ता.जि.अहमदनगर) येथील वनक्षेत्रात संयुक्त वन समितीच्या माध्यमातून बांधण्यात आलेले माती बंधारे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-१२-२०२०) :** (१) व (२) मौजे गुंडेगाव येथील ग्रामवन समितीच्या माध्यमातून सन २०१८ मध्ये १५ मातीबंधाऱ्यांची कामे झालेली आहेत. त्यापैकी ४ बंधाऱ्यातून किरकोळ प्रमाणात पाणी गळती होत असल्याचे जुलै २०२० मध्ये निदर्शनास आले आहे.
त्यापैकी एका बंधाऱ्यांची दुरूस्ती करून घेण्यात आली आहे. उर्वरीत तीन बंधाऱ्यात सद्यस्थितीत पाणीसाठा असल्याने त्याची दुरुस्ती पाणी कमी झाल्यानंतर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यात महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या उपविभागाचे विभाजन करून हलकर्णी (ता.चंदगड) अथवा शिनोळी (ता.चंदगड) येथे नवीन उपविभाग स्थापन करण्याबाबत**

**(४५) १३३५८ (१३-०९-२०२०). श्री.राजेश पाटील (चंदगड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथे महाराष्ट्र वीज वितरण कंपनीचे एकच उपविभागीय कार्यालय असल्याने तालुक्यातील वीज वितरक ग्राहकांना त्यांच्या वीज देयक तक्रारी व इतर अडचणी करिता ७० ते ८० कि.मी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते हे खरे आहे काय,
(२) तसेच चंदगड तालुक्यातील हलकर्णी येथे महाराष्ट्र शासनाची औद्योगिक वसाहत व शिनोळी येथील औद्यागिक वसाहतीच्या विजेचे कामकाज उक्त उपविभागामार्फतच पाहिले जाते हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, तालुक्यातील औद्योगिकरण, शेतीसाठी राबवल्या जाणाऱ्या सिंचन योजना, ग्रामपंचायतीच्या नळ पाणी योजना व घरगुती वीज वापर करणाऱ्या ग्राहकांची संख्या याचा विचार केल्यास हलकर्णी अथवा शिनोळी (ता.चंदगड) येथे नवीन उपविभाग स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-११-२०२०) :** (१) चंदगड (जि.कोल्हापूर) उपविभागाचे कार्यक्षेत्र अंदाजे १५० कि.मी. भागात पसरले असून, म्हाळुंगे कोळीक इ. गावे चंदगड पासून ७० कि.मी. अंतरावर आहे. तसेच चन्नहट्टी/राजमोळी इ. गावे सुमारे ५०-६० कि.मी. अंतरावर आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कोल्हापूर परिमंडळांतर्गत उपविभाग चंदगडचे विभाजन करून नवीन कार्वे उपविभागाची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीस प्राप्त झालेला आहे. परंतु कंपनीच्या मंडळ ठरावात प्रस्तुत केलेल्या मानंकाचे निकष पूर्ण होत नसल्याने सदरच्या प्रस्तावावर सद्य:स्थितीत कार्यवाही करणे शक्य नाही.

---

## कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रातील कुसुम इंडस्ट्रीज या तेलाच्या कंपनीमध्ये झालेला स्फोट

**(४६) १३४२३ (१७-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रातील कुसुम इंडस्ट्रीज या तेलाच्या कंपनीमध्ये दिनांक २२ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास स्फोट झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रात यापूर्वी देखील अनेक छोटे मोठे अपघात होत असून, अपघातांची ही मालिका बंद करण्यास प्रशासनाला अद्याप यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी अनेक वेळा बैठका घेऊन देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर ठिकाणी अपघात कमी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रात महामंडळाने अग्निशमन केंद्र कार्यान्वीत केले आहे. सदर अग्निशमन केंद्रासाठी एक वॉटर टेंडर, एक फोम टेंडर, व एक जीप इत्यादी यंत्रसामग्री व अग्निशमन बचाव उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच सदर अग्निशमन केंद्रासाठी २८ अधिकारी/ कर्मचारी इतके मनुष्यबळ मंजूर करण्यात आले आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, पुणे यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींसमवेत घेतलेल्या बैठकीमध्ये सर्व कंपन्यांनी त्यांचे भुखंडावर साठा करीत असलेल्या वा वापर करीत असलेल्या रसायनांची माहिती दर्शनी भागावर लावण्यात यावी अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे अध्यक्षतेखाली कामगार विभागामार्फत दिनांक १७/१/२०२० अन्वये राज्यातील रासायनीक व धोकादायक कारखान्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून परिक्षण व उपाययोजना सुचविण्यासाठी जिल्हानिहाय समिती गठित करण्यात आली असून त्यांच्यामार्फत सर्व रासायनीक व धोकादायक कारखान्यांचे परिक्षण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दर्यापूर (जि.अमरावती) येथे अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(४७) १३४५५ (०७-१०-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यात दिनांक ३ जुलै २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे शेकडो हेक्टरमधील शेतजमीन वाहून केली असून पावसाचे पाणी गावातील घरात शिरल्याने मोठया प्रमाणात घराचे व शेतीचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झालेल्या नुकसानाचे पंचनामे आणि सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकरी यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-११-२०२०) :** (१) होय हे खरे आहे,

(२) व (३) दि.०३.०७.२०२० रोजीच्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे झाले असून त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

---

### विटा-तासगाव (जि.सांगली) रस्त्यावरील कार्वेजवळील वीज उपकेंद्रात झालेला स्फोट

**(४८) १३६०३ (१५-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा-तासगाव (जि.सांगली) रस्त्यावरील कार्वेजवळील वीज उपकेंद्रात मोठा स्फोट झाल्याची घटना माहे मे २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटात महावितरणचे सुमारे कोट्यवधींचे नुकसान झाले असुन स्फ़ोटामुळे तीन तालुक्यांमध्ये वीज पुरवठा खंडीत झाला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-११-२०२०) :** (१) महापारेषण कंपनीच्या २२०/३३ के.व्ही., १०० एम.व्ही.ए. क्षमतेचे विटा (कार्वे) उपकेंद्र असून या उपकेंद्रात ५० एम.व्ही.ए. क्षमतेची एकूण दोन रोहित्र कार्यान्वित आहेत. सदर उपकेंद्रात दि.०५.०५.२०२० रोजी १७:५० वाजता तांत्रीक बिघाडामुळे ५० एम.व्ही.ए. क्षमतेच्या रोहित्र क्र.२ ला आग लागण्याची घटना घडली होती.

(२) हे अंशत: खरे आहे. सदर रोहित्रास आग लागण्याच्या घटनेमुळे महावितरण कंपनीच्या खानापुर व आटपाडी तालुक्यामधील १२ उपकेंद्रे व त्यावरील एकुण ६८४५४ ग्राहकांचा वीज पुरवठा साधारण दीड तास खंडीत झाला होता. तसेच तासगाव तालुक्यामधील २ उपकेंद्रे व त्यावरील एकुण १५२३५ ग्राहकांचा वीज पुरवठा साधारण सहा तास खंडीत झाला होता.

(३) सदर घटनेची महापारेषण कंपनीव्दारे सखोल तांत्रिक चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयात वादळासह आलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या द्राक्षबागायातदारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(४९) १३६३६ (१५-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वादळासह झालेल्या पावसमुळे तसेच कोरोनाच्या संसर्गामुळे जाहिर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सांगली जिल्हयातील द्राक्षबागायातदारांचे नुकसान झाले असल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वादळासह आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील द्राक्ष, केळी, मका यासह अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे हेही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त नुकसानीची शासनाने पाहणी अथवा पंचनामे केले आहेत काय त्यानुसार नुकसानग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२४-११-२०२०) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे,
(३) माहे मार्च, २०२० ते मे, २०२० या कालावधीत सांगली जिल्हयात वादळ व अवेळी पाऊसामुळे झालेल्या शेती पिकांचे नुकसानीबाबतचा अहवाल कृषी आयुकत, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयात स्वतंत्र व स्वयंपूर्ण केळी बाजारपेठेची निर्मिती करण्याबाबत**

**(५०) १४३२१ (२०-०९-२०२०). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील केळी बागायतदारांना त्यांची केळी खरेदी व विक्री करीता पुर्णत: शेजारील मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर बाजार पेठेवर अवलंबून राहावे लागत असून, खाजगी व्यापाऱ्यांच्या मक्तेदारीमुळे तेथील केळी उत्पादकांना योग्य भाव मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी जळगांव जिल्हयात स्वतंत्र व स्वयंपूर्ण बाजार पेठेची निर्मिती करण्याची मागणी वारंवार शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-११-२०२०) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.